https://swamisamarthsevekari.com/

# ।। मार्तंडभैरव षड्रात्रोत्सव ।।

# खंडेराव नवरात्र (चंपाषष्ठी) (मार्गशीर्ष शु.१ ते ६)

# मल्हारी षड्रात्री घटस्थापना विधी

श्री स्वामी स्तवन व एक माळ श्री स्वामी समर्थ जप

* 'मुनीनां सप्त कोटीणां वरदं भक्त वत्सलां। दुष्ट मर्दन देवेश वंदे हं म्हालसापती ।।

हा मंत्र म्हणत पुरुषांनी हळद व महिलांनी हळदी-कुंकू स्वतःच्या कपाळी लावावे.

खालील मंत्रांनी चार वेळा तळहातावर पाणी घेऊन प्यावे.

१) ॐ ऐं आत्मतत्वं शोधयामी नमः स्वाहा।

२) ॐ ह्रीं विद्यातत्वं शोधयामी नमः स्वाहा।

३) ॐ क्लीं शिवतत्वं शोधयामी नमः स्वाहा।

४) ॐ ऐं ह्रीं क्लीं सर्वतत्वं शोधयामी नमः स्वाहा।

गायत्री मंत्र म्हणत प्राणायाम करावा.

*** संकल्प** - 'मी (अमुक) गोत्रात उत्पन्न (अमुक) नावाचा/नावाची माझ्या सर्व कुटुंबाला क्षेम, स्थैर्य, आयु, आरोग्य, विद्या, ऐश्वर्य प्राप्तीसाठी, वर्धनासाठी, सर्व दुरीत उपशमनासाठी अशुभ शक्तींचे भय उपद्रव निवारण्यासाठी, आर्थिक सबलीकरणासाठी, आदित्यादी सकल ग्रहपीडा शांतीसाठी, त्रिविध ताप निरसनासाठी तसेच श्री कुलदेवी व श्री कुलदैवत व श्री सद्गुरूंची अखंड- अचंचल-अभेद्य भक्ती, सेवा व सान्निध्यप्राप्तीसाठी प्रतिवर्षी कुलधर्माच्या अंगभूत श्री घटस्थापना, अखंड दीपप्रज्वलन आणि श्री मल्हारी सप्तशती ग्रंथाचे (अमुक) संख्येत पाठाचा संकल्प करीत आहे.'

* श्री गणपती अथर्वशीर्ष एक वेळा पठण करावे.

* 'ॐ श्री गंगा-म्हाळसासहीत मणिमल्हारये नमः' या मंत्राचा जप करीत पुढील कृती करावी.



@swamisamarth.sevekari

१) घटस्थापनेच्या जागेवर रांगोळी काढून एक पाठ किंवा चौरंग ठेवावा, त्यावर पिवळे वस्त्र अंथरावे, चौरंगाच्या डाव्या बाजूस अखंड दीप प्रज्वलित करून त्याची पूजा करावी.

२) एक वेळूची टोपली त्या पाट अथवा चौरंगावर ठेवून टोपलीत आपल्या शेतातील अथवा पवित्र जागेची माती, गहू मिसळून भरावी.

३) त्यावर स्वच्छ धुतलेला मातीचा घट पिवळ्या लोकरीचे सहा वेढे देऊन ठेवावा.

त्यात पाणी, दुर्वा, सुपारी, पैसा, गंध, अक्षता टाकाव्यात, विड्याची पाच पाने व आंब्याचा डहाळा लावावा.

४) घटाच्या चारही दिशेला पूर्वकडून उतरते हळदीचे गंध लावावे, घटावर एका तांब्याच्या अथवा स्टिलच्या ताटलीत तांदूळ भरून त्यावर हळदीचे अष्टदल काढून ठेवावे.

५) खालील प्रमाणे खंडोबाची पूजा करावी.

* ध्यान ध्यायेन्मल्लारिदेवं कनकगिरिनिभं म्हाळसा भूषिताङकम्। श्वेताश्वं खड्गहस्तं विबुधबुधगणैः सेव्यमानं कृतार्थैः ।। युक्तांघ्रिं दैत्यमूर्ध्नि डमरुविलसितं नैशचूर्णाभिरामम् । नित्यं भक्तेषु तुष्टं स्वगणपरिवृतं नित्येमोंकाररूपम् ।। म्हणून टाकास नमस्कार करावा.

* खंडोबाच्या टाकावर १ वेळा श्रीसूक्त व एक वेळा रुद्र अथवा शिवमहिम्न म्हणून अभिषेक करावा.

* घटावर विड्याची दोन पाने पुर्वेकडे देठ करून ठेवावी, त्यावर खंडोबाचा टाक झोपवून ठेवावा.

* टाकाची पंचोपचार पूजा करावी.

# * पंचोपचार पूजा :

१) ॐ श्री मार्तंड भैरवाय नमः। विलेपनार्थे चंदनम् समर्पयामि।। (गंध लावावे.) अलंकारार्थे अक्षताम् समर्पयामि।। हरिद्रांकुंकुम् सौभाग्यद्रव्याणि समर्पयामि ।। (गंध लावावे, अक्षता वहाव्यात व हळद-कुंकू वहावे.)

२) ॐ श्री मार्तंड भैरवाय नमः। ऋतुकालोद्भव पुष्पम् समर्पयामि ।। (फुले वहावीत.)

३) ॐ श्री मार्तंड भैरवाय नमः। धूपम् आघ्रापयामि।। (धूप ओवाळावा)

४) ॐ श्री मार्तंड भैरवाय नमः। दीपं दर्शयामि। (दीप ओवाळावा.)

५) ॐ श्री मार्तंड भैरवाय नमः। पंचामृतात्मकं नैवेद्य समर्पयामि ।।

(पंचामृत वाटीत एकत्र करून त्याचा नैवेद्य दाखववावा.)

* पूजेनंतर १ माळ घटावर खालील मंत्राने बांधावी. 'ॐ मां माले महामाये सर्वशक्ति स्वरूपिणी। चतुर्वर्ग त्वयी न्यस्ते स्तन्मान्मे सिद्धिदा भव ।।'

पहिल्या दिवशी विड्याच्या पानांची माळ बांधावी.

@swamisamarthsevekari

रोज घटावरील टाकाची दूरूनच पंचोपचार पूजा करून, टाकास हळद वाहावी व घटास रोज पिवळ्या फुलांची माळ बांधावी, आरती करावी.

* सहा दिवसात सर्व कुटुंबियांनी मिळून १४ किंवा २८ पाठ श्री मल्हारी सप्तशती ग्रंथाचे करावे.

* चंपाषष्टीच्या दिवशी शंख किंवा घंटा ध्वनीत घटावरील खंडोबाचा टाक उचलून प्रतिपदेप्रमाणे अभिषेक व पूजन करावे. परंपरेनुसार कुलाचार व कुलधर्म पूर्ण करून, तळी भरून महानैवेद्य त्यात बाजरीची भाकरी, नव्या वांग्याचे भरीत, पातीचा कांदा, नवा लसूण घालून मुख्य नैवेद्य तसेच पुरणपोळी सुद्धा करावी.

# * तळी भरणे

कुळधर्माच्या वेळी नैवेद्य दाखविण्यापूर्वी तळी भरतात. ताम्हणात तांदळाचे अष्टदल काढून त्यात भंडारा म्हणजे हळद भरतात. नंतर मध्यभागी तांब्यात पैसा, सुपारी वर नागवेलीची पाने ठेवून नारळ ठेवतात याची कलशासह पूजा करतात. पाच मुलांनी हात लावून ताम्हण वर उचलून त्यावर तीनवेळा कपाळ टेकवतात व 'येळकोट मल्हार, सदानंदाचा येळकोट, म्हाळसाकान्त कडे पठार की जय' असा जयजयकार करतात. तसेच काही प्रदेशात

**'येळकोट मल्हार, सदानंदाचा येळकोट, म्हाळसाकान्त कडे पठार की जय'**

सदानंदाचा येळकोट, येळकोट मल्हार येळकोट ।
हर हर महादेव । चिंतामण मोरया । भैरोबाचा चांदोबा ।
अंगडबंब नगारा । सोन्याची जेजुरी ।
मोत्याचा तुरा ।
निळा घोडा । पायी तोडा । कमर करगोटा ।
बेंबी हिरा ।
गळ्यात कंठी । मोहनमाळा । डोईवर शेला । अंगावर शाल ।
सदा हिलाल ।
जेजुरी जाई । शिकार खेळी ।
म्हाळसासुंदरी । आरती करी । देवा ओवाळी । नानापरी । देवाच्या शृंगारा । कोट लागो शिखरा । खंडेरायाचा खंडका । भंडाराचा भडका ।

बोल सदानंदाचा येळकोट ।

असे म्हणतात. हे म्हणताना हातात दिवटी-बुधली असते. विवाहापूर्वीचा कुलधर्म असेल, तर भाऊबंदांनीही त्यांच्या दिवट्या आणावयाच्या असतात. नंतर वरीलप्रमाणे जयजयकार करीत जेजुरीच्या दिशेने दिवट्या-बुधल्या घेऊन थोडे जायचे असते (किमान ५ पावले). त्या दिशेस खोबरे व भंडारा उधळून जयजयकार करून घरी यायचे आणि नंतर नैवेद्य, पुराणाच्या १४ दिव्यानी आरती करावी, जमल्यास धनगर जोडप्यास जेऊ घालावे.

* षष्टीच्या दिवशी घटाची माती व टोपली प्रवाहात विसर्जित करावी, जमलेली हळद पुरुषांनी नित्य कपाळास लावण्यास ठेवावी.

@swamisamarth.sevekari

https://swamisamarthsevekari.com/

https://youtube.com/@swamisamarth_sevekari?si=u0fT589ChAm-odp9

https://www.instagram.com/swamisamarth.sevekari?igsh=MWFqMHpvbmF2ZmlmMg%3D%3D&utm_source=qr

स्वामी समर्थांच्या अपरंपार कृपेचा प्रकाश अधिकाधिक भक्तांपर्यंत पोहोचावा, हीच सेवाभावाची भावना मनात ठेवून आम्ही **Instagram** आणि **YouTube** वरून स्वामींच्या चरणी भक्तिमय कथा, प्रेरणादायी सेवाकार्य, आरत्या, नामस्मरण आणि आध्यात्मिक मार्गदर्शन तुमच्यापर्यंत पोहोचवत आहोत. आमच्याशी जोडले गेल्यावर तुम्हाला दररोज नवी आध्यात्मिक ऊर्जा, सकारात्मकता आणि स्वामीभक्तीची अनुभूती मिळेल. चला, आपण सर्वजण मिळून स्वामींचा संदेश अधिक विस्तारूया. आमच्या **Instagram** पेजला फॉलो करा आणि **YouTube** चैनलला सबस्क्राईब करा—स्वामी समर्थांच्या कृपाशक्तीचा प्रवाह तुमच्या जीवनात अखंड वाहत राहो. श्री स्वामी समर्थ!

@swamisamarth.sevekari